**Review Of Research**
**Volume-2, Issue- 6 , March -2013**
**ISSN : 2249-894X** Available online at www. lbp.world

# नागपूर जिल्हातील कामठी नगरपालिकेने नगरवासींयांकरीता केलेल्या विविध कार्यांचे मूल्यमापन

**ममता पुनम ईलमकर[1] , डॉ. सतिश पुंडलीकराव डुडुरे[2]**
**[1]संशोधनकर्ती**
**[2]मार्गदर्शक , एम.कॉम., एम.फिल., पीएच.डी.**

**सारांश**

प्रस्तुत संशोधनात कामठी नगरपालिकेच्या कार्याची व्याप्ती विचारात घेऊन निष्कर्ष शोधून काढण्यासाठी अभ्यास करण्यात आले. स्थानिक स्वराज्य सत्तांवर सोपविलेली जबाबदारी पूर्ण करण्याकरीता कामठी नगरपालिका किती यशस्वी झाली आहे. त्याचे मूल्यमापन करणे. कामठी नगरपालिकेचे नियंत्रण आणि स्थानिक नागरिकांचे सहकार्या मुळे नगरपालिकेवर होणारे परिणाम याचाही अभ्यास करणे. स्थानिक नागरिकांनी आपल्यातून निवडून दिलेल्या सेवाभावी व्यक्ति ऐवजी सत्तालोभी लोकांचे वर्चस्व कामठी नगरपालिकेत आहेत का? सेवाभावी लोकप्रतीनिधी जातीचे राजकारण करून जनतेशी भेदभाव करून सत्ताधारी जनतेच्या मुलभूत सोयी कडे दुर्लक्ष करून प्रशासकीय कार्यात हस्तक्षेप कितपत आहे. संपत्तीचे मुल्याकनांनुसार कर वसुल करण्याकरीता कायद्यामध्ये ज्या तरतूदी आहेत त्याची अमलबजावणी नियमित होते किंवा नाही याचाही अभ्यास करण्यात आला. तसेच नगरपालिकांनी तयार केलेल्या आय व्यय अहवालातील मुख्य पदांचे विश्लेषणा करीता त्याची माहिती घेण्यात आली.

**प्रस्तावना –**

प्रस्तुत संशोधन प्रकल्पात “एकका कडून सर्वसाधारण निष्कर्षाकडे” तत्वाचा विचार करून संशोधनासाठी **“नागपूर जिल्हातील कामठी नगरपालिकेने नगरवासींयांकरीता केलेल्या विविध कार्यांचे मूल्यमापन”** याचा विचार केला त्यासाठी चिकित्सक आणि शास्त्रोक्त पध्दतीने संशोधनाचे काम करण्यासाठी निश्चित अशी उद्दिष्ट समोर असणे आवश्यक असते. महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ या कायद्याच्या मूळ उद्देश यशापयशाचे मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने तसेच नागरिकांना त्यांच्या मुलभूत हक्काचा, अधिकाराचा आणि जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न हया कायद्यातील तरतुदीनुसार कितपत झाला आहे. सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि विविध मुलभूत सोयी नागरिकांना मिळवून देण्याकरिता हा कायदा कितपत उपयोगी पडतो. या व्यतिरिक्त कायद्यातील तरतुदीची अंमलबजावणी करण्याचे कार्य ज्या प्रशासनावर आणि लोकसेवक, लोकप्रतिनिधी वर आहे, ते खरोखरच निस्वार्थ नेतृत्व करतात काय ? ज्यांच्या हिताकरिता हा कायदा अमलात आला त्यांचे हित खऱ्या अर्थाने साध्य होते काय, या अधिनियमा मुळे नागरिकांच्या गरजा कोणत्या आहे, त्यावर नागरिकांचे अधिकार कोणते, तसेच शहराचा विकासाकरीता नगरपालिकेची जबाबदारी कोणती आहे ? या अनेक कारणाचे मंथन करून या विषयाच्या अभ्यासासाठी उद्देश निर्धारित करण्यात आले. सर्वच नगरपालिकांची

कार्यपध्दती आणि कार्यपणाली जवळ जवळ एकसारखीच असते परंतु उत्पन्नाचे आणि खर्चाचे मार्ग यात भिन्नता असते त्यामुळे उद्देश निर्धारित करण्यासाठी नागपूर जिल्हातील कामठी नगरपालिकेच्या विविध कार्याचा दृष्टीकोनातून अभ्यास पुढील प्रमाणे करण्यात आला आहे.

कामठी नगरपालिकेच्या विविध कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास हा मुख्यत: तिन स्तंभावर आधारित आहे. हे तिन स्तंभ कामठी नगरवासी, कामठी नगरपालिकेतील सन्माननीय नगरसेवक व कामठी नगरपालिकेतील कार्यरत कर्मचारी आहेत. या तिनही स्तंभांच्या सामंजस्यपणानेच कामठी नगरपालिका आपले कार्य सुरळीत करू शकते.


प्रस्तुत संशोधनासाठी कामठी नगरपालिकेतील एकूण ३१ वार्डातुन ६२० नगरवासींची नमुना म्हणून निवड करण्यात आली आहे. अध्ययनासाठी १९९८–९९ ते २००८–०९ असा एकूण दहा वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. याद्वारे प्राप्त लक्ष्यांच्या आधारे सारख्या करण्यात आल्या व लाभार्थीची परिस्थिती स्पष्ट करण्यात आलेली आहे.

**सारणी क्र. १ अभ्यासीत कामठी नगरवासींयाचे कामठी नगरपालीकेच्या कार्यापासुन केलेले वर्गीकरण**

| अ. क्र. | कार्य | नगरवासियांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | स्वच्छता ठेवणे | २०० | ३२.२५ |
| २. | प्राथमीक शिक्षण | २० | ३.२४ |
| ३. | जन्म मृत्युची नोंद | २५ | ४.०५ |
| ४. | सांडपाणी व केरकचरा विल्हेवाट | ४० | ४.४६ |
| ५. | सार्वजनिक तळे, विहरी, बंधारे बांधणे | २२० | ३५.४८ |
| ६. | उद्याने व बागा तयार करून त्यांची व्यवस्था करण | ११५ | १८.५४ |
| | एकूण | ६२० | १०० |

**आलेख क्र. १**

**अभ्यासीत कामठी नगरवासीयांचे कामठी नगरपालीकेच्या कार्यापासुन केलेले वर्गीकरण**





वरील तक्त्यावरून व आलेखावरून कामठी नगरवासींयाना त्यांच्या नगरपालीकांचे कोणते कोणते कार्य अवगत आहे याबद्दल कल्पना येते. त्यावरून स्वच्छता ठेवणे व सार्वजनीक तळे व विहरी बांधणे हे कार्य कामठी नगरवासीयांना सर्वात जास्त अवगत असल्याचे समजते.

**सारणी क्र. २ अभ्यासीत कामठी नगरवासीयांचे कामठी नगरपालिकेने त्यांच्या वार्डात केलेल्या कामावरून केलेले वर्गीकरण**

| अ. क्र. | कार्य | नगरवासियांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | साफ-सफाई | १२४ | २०.०० |
| २. | विद्युत देखरेख | ४० | ६.४६ |
| ३. | सांडपाणी विल्हेवाट | १८० | २९.०३ |
| ४. | प्राथमीक शिक्षण | ५६ | ९.०३ |
| ५. | पिण्याच्या पाण्याची व्यवस्था | २२० | ३५.४८ |
| | एकूण | ६२० | १०० |

**आलेख क्र. २अभ्यासीत कामठी नगरवासीयांचे कामठी नगरपालीकेने त्यांच्या वार्डात केलेल्या कामावरून केलेले वर्गीकरण**





वरील तक्त्यावरून व आलेखावरून स्पष्ट कल्पना येते की, अभ्यासीत नगरवासीयानी त्यांच्या कामठी नगरपालीका वार्डात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व साफ-सफाईचे काम करते. वरील तक्त्यावरून व आलेखावरून कामठी नगरपालीका आपल्या वार्डात कोणते काम करते याबाबत नमुन्यातील लोकांनी आपले मत प्रकट केले. यावरून पिण्याच्या पाण्याची सोय, सांडपाणी विल्हेवाट, साफ-सफाई इ. काम प्रकर्षाने सांगण्यात आली.

**सारणी क्र. ३अभ्यासीत कामठी नगरवासीयांचे कामठी नगरपालिकेने कामठी नगरपालीकेने केलेल्या सांगितलेल्या कार्यापासुन केलेले वर्गीकरण**

| अ. क्र. | कार्य | नगरवासियांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | भाजीपाल मार्केट | १२० | १९.३५ |
| २. | शिवाजी महाराज पुतळा | ३० | ४.८३ |
| ३. | गडर योजना | ११० | १७.७४ |
| ४. | मुस्लिम समाज भवन | २०० | ३२.२५ |
| ५. | रस्ते विभाजक | १४० | २२.५८ |
| ६. | जलपुर्ती योजना | २० | ३.२४ |
| | एकूण | ६२० | १०० |

**आलेख क्र. ३अभ्यासीत कामठी नगरवासीयांचे कामठी नगरपालिकेने कामठी नगरपालीकेने केलेल्या सांगितलेल्या कार्यापासुन केलेले वर्गीकरण**




अभ्यासीत कामठी नगरवासीयांना कामठी नगरपालीकेने कामठी नगरात अभ्यासीत काळात म्हणजेच १९९८-९९ ते २००८-०९ या वर्षामध्ये कोणते उल्लेखनीय काम केले असे विचारता मुस्लिम समाज भवन, रस्ते विभाजक, भाजीपाला मार्केट हे प्रमुख कार्य सांगीतले.

**निष्कर्ष**

अभ्यासीत कामठी नगरवासीयांना कामठी नगरपालिकेचे कार्य विचारले असता त्यंनी खालील कार्याचा प्रामुख्याने उल्लेख केला, स्वच्छता ठेवणे, सार्वजनिक विहरी , तळे बांधणे, उद्याने व बागा तयार करून त्यांची देखरेख करणे, प्राथमिक शिक्षण व जन्म मृत्युची नोंद ठेवणे.कामठी नगरपालिकेने त्यांच्या वार्डात कोणते काम केले असे विचारले असता खालील कामे केल्याचे प्रकर्षाने जाणविते, साफ सफाई ठेवणे, सांडपाण्याची विल्हेवाट, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था. तसेच कामठी नगरपालिकेने कामठी नगरात कोणते उल्लेखनिय काम केले असे विचारले असता, मुस्लिम समाज भवन बांधणे, रस्ते विभाजक, भाजीपाल मार्केट, गडर योजना या कामांचा प्रामुख्याने उल्लेख होतो.

**संदर्भग्रंथ सूची**


- डॉ. एखेलीकर - भारतातील स्वशासन
- डॉ. दर्शनकार अर्जूनराव - पंचायत राज व नागरी प्रशासन.
- चौधरी - मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९.
- प्रा. ठोंबरे सतीश - महाराष्ट्र व जिल्हा प्रशासन
- डॉ. बढे जी. एस. - भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था उगम व विकास
- डॉ. बाचल वि. मा. व नायगांवकर सुधाकर - भारतातील स्थानिक शासन
- प्रा. यमलवाड गोविंद - स्थानिक स्वराज्य संस्था
- महाराष्ट्र नगर परिषदा व पंचायत समिती कायदा १९६१.

- महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५.
- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४८.
- डॉ. प्रदीप सचदेव – भारत में नगरीय स्थानिय एवं प्रशासन.
- शर्मा हरिचंद्र – भारत में स्थानिय शासन.
- शर्मा अशोक – भारत में स्थानिय प्रशासन.
- दैनिक लोकमत
- दैनिक तरूण भारत
- दैनिक भाष्कर
- दैनिक देशोन्नती
- दैनिक सकाळ
- दैनिक नवभारत
- दैनिक लोकमत समाचार
- दैनिक हितवाद
- दैनिक लोकसत्ता
- दैनिक टाईम्स ऑफ इंडिया